**व्यवसायकर कायद्याखाली विशिष्ट कालावधीत नांव नोंदणी करुन घेणा-यांसाठी कर, व्याज आणि शास्ती यामध्ये सवलत देण्याची योजना. "व्यवसायकर नांव नोंदणी प्रोत्साहन योजना- २००९"**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-व्यकर-११०९/प्रक्र.३५/कराधान-३,**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२,**
**दिनांक: २९ जुलै २००९**

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोक-या यावरील कर अधिनियम, १९७५ (व्यवसायकर कायदा, १९७५) अन्वये व्यवसायकर भरण्यास पात्र असलेल्या व्यक्ती, संस्था आणि आस्थापना यांनी विहित कालावधीत नांव नोंदणीकरण करुन घेवून व्यवसाय कर भरणे बंधनकारक आहे. देय व्यवसायकर भरण्यास विलंब झाल्यास उक्त कायदयामध्ये व्याज आणि शास्ती आकारण्याची तरतूद आहे. शासनाच्या निदर्शनास असे आले आहे की, अद्यापही अनेक व्यक्ती, संस्था आणि आस्थापना नांव नोंदणी करुन न घेता व्यवसाय करीत आहेत. अशा प्रकारच्या व्यक्ती, संस्था आणि आस्थापना यांना देय व्यवसायकर, त्यावरील व्याज व शास्तीमध्ये काही सवलत दिल्यास अशा व्यक्ती, संस्था, आस्थापना नाव नोंदणी करण्यास आपणहून पुढे येतील व त्यायोगे शासनाच्या महसुलात भर पडेल. अशा व्यक्ती, संस्था आणि आस्थापनांना नियमीत करदाते होण्यासाठी विशिष्ट कालावधीत काही सवलतीसह नांवनोंदणीकरणाची संधी देण्याचे राज्याच्या मा. वित्त मंत्र्यांनी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पिय भाषणात प्रस्तावित केले होते. त्यानुसार शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

राज्यातील नांव नोंदणीकृत न झालेल्या स्वयंव्यवसाय करणा-या व्यावसायिकांना व्यवसायकर कायदयाखाली नांव नोंदणी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा देय असलेला व्यवसायकर, त्यावरील देय व्याज आणि शास्ती यामध्ये सवलत देण्याकरिता एक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेस "व्यवसायकर नांव नोंदणी प्रोत्साहन योजना- २००९" असे संबोधण्यात येईल. या योजनेचा कालावधी, अटी, सवलती आणि कार्यपध्दती खालील प्रमाणे असतील.

**क) योजनेचा कालावधी:-**

"व्यवसायकर नांव नोंदणी प्रोत्साहन योजना- २००९" ही दिनांक १ ऑगस्ट २००९ ते ३१ मार्च २०१० या कालावधीसाठी मर्यादित आहे.

**ख) योजनेच्या अटी :-**

१) ही कर सवलत घेवू इच्छिणा-या व्यक्ती, संस्था किंवा आस्थापना यांनी योजनेच्या कालावधीमध्ये नांव नोंदणीकरणासाठी अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

२) नांव नोंदणीसाठी अर्ज दाखल करताना अर्जदार व्यक्ती, संस्था किंवा आस्थापना यांनी दिनांक १ एप्रिल, २००५ ते ३१ मार्च २०१० या कालावधीसाठी त्यांचा देय असलेला संपूर्ण व्यवसायकर व त्यावरील देय व्याजाच्या संपूर्ण रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील. तसेच अशी रक्कम भरल्याबाबतचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३) ही योजना सुरु होण्या पूर्वी म्हणजे दिनांक ३१ जुलै २००९ पर्यंत अर्जदाराने भरलेल्या कोणत्याही प्रकारच्या रकमेचा अंतर्भाव या सवलत योजनेखाली भरावयाच्या रकमेमध्ये केला जाणार नाही, तसेच ही योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या रकमेचा परतावा दिला जाणार नाही.

**ग) योजनेखालील सवलती :-**

वर नमूद केलेल्या अटींची पूर्तता केल्यास अर्जदारास पुढील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

१) या योजनेतंर्गत पात्र अर्जदारास दिनांक १ एप्रिल २००५ च्या पूर्वीच्या कालावधीमधील देय व्यवसायकर, त्यावरील देय व्याज आणि शास्ती यांची संपूर्ण रक्कम माफ करण्यात येईल.

२) या योजनेतंर्गत दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २०१० या कालावधीमधील भरण्यात आलेला व्यवसायकर उशीरा भरल्यामुळे आकारण्यात येणा-या शास्तीची संपूर्ण रक्कम माफ करण्यात येईल.

**घ) योजनेची कार्यपध्दती :-**

१) ही योजना राबविण्यासाठी आवश्यक ती कार्यपध्दती ठरविण्याचे अधिकार 'विक्रीकर आयुक्त' महाराष्ट्र राज्य, यांना देण्यात येत आहेत.

२) या योजनेच्या अंमलबजावणीचे सर्व अधिकार 'विक्रीकर आयुक्त,' महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत आहेत. हे अधिकार विक्रीकर आयुक्त त्यांच्या दुय्यम अधिका-यांना प्रदान करु शकतील.

**च)** योजनेतील तरतूदी, व अटींबाबत कांही शंका किंवा प्रश्न उपस्थित झाल्यास त्याबद्दल निर्णय देण्याचा अधिकार 'विक्रीकर आयुक्त,' महाराष्ट्र राज्य यांना राहील, व त्यांचा निर्णय अंतिम राहिल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( चित्रा कुलकर्णी )
विशेष कार्य अधिकारी,वित्त विभाग

प्रत:-
१) विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, ८ वा मजला, माझगांव, मुंबई-४०० ०१०.
२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय,६ वा मजला, विधान भवन, मुंबई-३२.
९) निवड नस्ती, कराधान-३